# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440

**परिपत्रक क्र.५३४/२०२६**

**विषय : नाशिक जिल्ह्यातील दिनांक ०७ जुलै, २०२६ रोजीच्या विद्यापीठ आयोजित परीक्षांच्या फेर आयोजनाबाबत..**

**संदर्भ :** १. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे जा.क्र.मनपा शिक्षण विभाग/१७३५/२०२६, दिनांक ०६.०७.२०२६ रोजीचे पत्र.

२. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे संदर्भ क्र.आपत्ती व्यवस्थापन/२०२६, दिनांक ०६.०७.२०२६ रोजीचे पत्र.

नाशिक जिल्ह्यातील पुढील ४८ तासात ढगफुटी सदृश्य पावसाचा अंदाज असून त्र्यंबकेश्वर आणि नाशिक मध्ये ३०० मिलीमिटरपेक्षा जास्त पाऊस पडण्याची भिती असल्याने हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या अनुषंगाने विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने नाशिक मनपा परिक्षेत्र व जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांना, महाविद्यालय यांना उपरोक्त संदर्भिय पत्रांद्वारे दिनांक ०७.०७.२०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे.

या पार्श्वभूमीवर **नाशिक जिल्ह्यातील दिनांक ०७.०७.२०२६ रोजीच्या दोन्ही सत्रातील विद्यापीठ आयोजित परीक्षा** पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. या संदर्भातील पुनर्नियोजित वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

तसेच पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील सदर दिवशीच्या परीक्षा ह्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच होतील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तरी याबाबत महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक संबंधित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे विद्यार्थी, शिक्षक व इतर घटकांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(प्रा.डॉ.राजेंद्र तलवारे)
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र. ९७३, दिनांक: ०६.०७.२०२६

**प्रति,**
**१) मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था नाशिक जिल्हा.**
**२) मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित समूह परीक्षा केंद्रे, नाशिक जिल्हा.**

**प्रत माहितीसाठी:**
१) मा.कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
५) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
६) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.

# शिक्षण विभाग, महानगरपालिका नाशिक

कार्यालय :- राजीव गांधी भवन, शरणपूर रोड नाशिक -४२२००२

Email:- nmcschoolboard@gmail.com, esa_nmc@rediffmail.com


जा.क्र. - मनपा शिक्षण विभाग / 9134 /२०२६ दिनांक ६/ ०७/२०२६

परिपत्रक

प्रति,

सर्व मुख्याध्यापक ,
प्राथमिक / माध्यमिक / महाविद्यालय
सर्व माध्यम, सर्व व्यवस्थापन
मनपा नाशिक

विषय :- हवामानशास्त्र यांनी दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या अनुषंगाने नाशिक मनपा परिक्षेत्रातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक माध्यमिक शाळांना , महाविद्यालय यांना मंगळवार दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सुटी जाहीर करणेबाबत..

संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचेकडील निर्देश दि. ०६/०७/२०२६

नाशिक जिल्हयात पुढील ४८ तासात ढगफुटी सदृश्य पावसाचा अंदाज असून त्रंबकेश्वर आणि नाशिक मध्ये ३०० मिलीमिटरपेक्षा जास्त पाऊस पडण्याची भिती आसल्याने हवामानशास्त्र विभागाने यांनी दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या अनुषंगाने विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने नाशिक मनपा परिक्षेत्रातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक माध्यमिक शाळांना, महाविद्यालय यांना मंगळवार दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सुटी जाहीर करण्यात येत **आहे.**

(मनिषा खत्री भा.प्र.से.)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत माहितीस्तव
१) मा. जिल्हाधिकारी, सो. नाशिक .

प्रत
१) मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग नाशिक
२) मा. शिक्षणाधिकारी प्राथमिक / माध्यमिक जि. प. नाशिक.

Scanned by CamScanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

**दुरध्वनी क्र.** 0253-2317151 Toll Free- 1077 E-Mail- ddmanashik@gmail.com

**वाचले:-** 1. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
2. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र. **संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९९/एसडी-२, दि.०२.०८.२०१९.**
3. भारतीय हवामान विभाग, मुंबई यांचेकडील पूर्व सूचना दिनांक **०६.०७.२०२६.**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
क्र.कक्ष/आपत्तीव्यवस्थापन/ /2026
**दिनांक:-** 06/07/2026

**आदेश :-**

ज्याअर्थी, भारतीय हवामान विभाग, मुंबई यांनी दिनांक **०७ जुलै २०२६** रोजी नाशिक जिल्ह्यास **Red Alert** घोषित करून जिल्ह्यात काही ठिकाणी **अधिक पाऊस पडण्याची /अतिवृष्टी, ढगफुटीसदृश परिस्थिती, विजांचा कडकडाट, पूरस्थिती, भूस्खलन तसेच नैसर्गिक आपत्तीजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता** व्यक्त केली आहे.

ज्याअर्थी, सदर परिस्थितीमुळे नागरिकांच्या जीवितास, मालमत्तेस, सार्वजनिक पायाभूत सुविधांना तसेच जनावरांना गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असून, आपत्तीपूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

ज्याअर्थी, **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५** मधील **कलम २५** अन्वये जिल्हाधिकारी हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष असून, **कलम ३० व ३४** अन्वये आपत्ती प्रतिबंध, जीवित व मालमत्तेचे संरक्षण, धोकादायक क्षेत्रातून नागरिकांचे स्थलांतर, विविध विभागांना निर्देश देणे, सार्वजनिक सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे तसेच **कलम ६५** अन्वये आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री, वाहने व इतर संसाधने अधिग्रहित करण्याचे अधिकार प्राप्त आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 02 अन्वये स्थानिक नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यास शाळा व शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

**त्याअर्थी**, नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण, संभाव्य आपत्तीमुळे होणारी जीवितहानी टाळणे, सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करणे व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने, मी **आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

१. नाशिक जिल्ह्यातील **त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक ग्रामीण** या तालुक्यांमधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, अंगणवाड्या, आश्रमशाळा, अनुदानित, विनाअनुदानित, खासगी शाळा तसेच सर्व महाविद्यालयांना दिनांक **०७ जुलै २०२६** रोजी सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. तथापि, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनेनुसार आवश्यकतेनुसार उपस्थित राहून आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित कामकाजासाठी सज्ज राहावे.

२. नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील शाळा बंद करणेबाबतचा निर्णय नाशिक महानगरपालिके मार्फत स्थानिक परिस्थिती नुसार घेण्यात यावा.

३. सर्व नागरिकांनी अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडू नये. नदी, नाले, ओढे, धरणे, तलाव, जलाशय, पूल, गड-किल्ले, घाट परिसर, पूरप्रवण भाग, डोंगर उतार व भूस्खलन संभाव्य भागात जाणे टाळावे.

४. त्र्यंबकेश्वर, वणी (सप्तशृंगी) तसेच जिल्ह्यातील सर्व धबधबे, धबधबा परिसर, ट्रेकिंग पॉईंट्स, नदीकाठ, पर्यटनस्थळे व पूरप्रवण धार्मिक स्थळे पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात येत असून, नागरिकांच्या प्रवेशास मनाई करण्यात येत आहे. संबंधित महसूल, पोलीस, वन विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक बॅरिकेडिंग करून प्रवेश प्रतिबंधित करावा.

५. जिल्ह्यातील सर्व आठवडी बाजार, जत्रा, मेळावे व मोठ्या सार्वजनिक गर्दीचे कार्यक्रम पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत आहेत.

६. महानगरपालिका आयुक्त, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी व ग्रामपंचायती यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सखल, पूरप्रवण व भूस्खलनाच्या धोक्याच्या भागातील नागरिकांचे **१०० टक्के सुरक्षित स्थळी स्थलांतर** सुनिश्चित करावे. आवश्यकतेनुसार निवारा केंद्रे सुरू करून अन्न, पिण्याचे पाणी, औषधे व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

७. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६५ अन्वये आवश्यकतेनुसार जे.सी.बी., पोकलेन, अर्थमूव्हर्स, बोटी, क्रेन, ट्रॅक्टर, वाहने, इमारती अथवा इतर संसाधने अधिग्रहित करण्याचे आदेश संबंधित महानगरपालिका आयुक्त, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी यांनी निर्गमित करावेत. अशा प्रत्येक आदेशाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास तात्काळ सादर करावी.

८. सर्व विभागप्रमुख, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, आयुक्त, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी उपस्थित राहून २४×७ दक्ष राहून नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवावे. सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये.

९. राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF), राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), अग्निशमन दल, होमगार्ड, आपदा मित्र स्वयंसेवक तसेच स्थानिक बचाव पथके यांना आवश्यक ती खबरदारी घेऊन संवेदनशील ठिकाणी तात्काळ तैनात करण्यात यावे. सर्व आवश्यक बचाव साहित्य, जे.सी.बी., अर्थमूव्हर्स, बोटी, जनरेटर, लाईफ जॅकेट्स व इतर उपकरणे कार्यस्थितीत ठेवावीत.

१०. सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांनी धोकादायक पूल, कॉजवे व पूरग्रस्त रस्त्यांवर तात्काळ बॅरिकेडिंग करावी. आवश्यकतेनुसार वाहतूक बंद अथवा पर्यायी मार्गाने वळवावी. अतिवृष्टीग्रस्त भागातील महामार्गांवर वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवून सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करावी.

११. जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सर्व रुग्णवाहिका कार्यरत ठेवाव्यात. पूरप्रवण भागातील उच्च जोखीम असलेल्या गर्भवती महिलांची ओळख पटवून आवश्यकतेनुसार त्यांना सुरक्षित आरोग्य संस्थेत आगाऊ दाखल करण्याची कार्यवाही करावी.

१२. पशुसंवर्धन विभागाने पूरप्रवण भागातील जनावरांच्या सुरक्षित स्थलांतराची, चारा, पिण्याचे पाणी, पशुवैद्यकीय उपचार व तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करावी.

१३. महावितरण कंपनीने धोकादायक भागात आवश्यकतेनुसार वीजपुरवठा सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद अथवा पूर्ववत करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

१४. सर्व दूरसंचार सेवा प्रदात्यांनी मोबाईल व इंटरनेट सेवा अखंडित राहतील यासाठी आवश्यक बॅकअप व्यवस्था व तांत्रिक पथके सज्ज ठेवावीत.

१५. जिल्हा, तालुका व स्थानिक स्वराज्य संस्थांचे आपत्ती नियंत्रण कक्ष चोवीस तास कार्यरत ठेवून प्रत्येक घटनेची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षास तात्काळ कळविण्यात यावी.

१६. सर्व नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. केवळ भारतीय हवामान विभाग, राज्य शासन व जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

१७. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६० तसेच इतर लागू कायद्यांनुसार** आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू राहील.**

**सदर आदेश आज दिनांक ०६ जुलै २०२६ रोजी माझ्या सही व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुद्रेसह निर्गमित करण्यात येत आहे.**

Digitally signed by
Ayush Prasad
Date: 06-07-2026
16:45:52

**(आयुष प्रसाद)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रत-**

१. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. संचालक,आपत्ती व्यवस्थापन प्रभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीसाठी.
६. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.
७. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक / इगतपुरी-त्र्यंबकेश्वर / कळवण.
८. उपविभागीय अधिकारी निफाड, दिंडोरी, बागलाण, चांदवड, येवला, मालेगाव.
९. अधीक्षक अभियंता, सा. बा. मंडळ, नाशिक यांना माहितीस्तव व उचित कार्यावाहीस्तव.
१०. अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक.
११. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या.,नाशिक ( शहर/ ग्रामीण).
१२. सह आयुक्त, पशु संवर्धन, नाशिक.
१३. तहसिलदार (सर्व).
१४. प्रादेशिक परिवहन अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, नाशिक.
१५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
१६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक.
१७. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
१८. गटविकास अधिकारी (सर्व) .
१९. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माधामिक) जिल्हा परिषद, नाशिक यांना उचित कार्यवाहीसाठी.
२०. जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक यांचेकडे उचित प्रसिद्धीसाठी.
२१. संबंधित सर्व विभाग प्रमुख.........................................